# ग्राहक गा-हाणे निवारण मंच
# महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
# औरंगाबाद परिमंडल, औरंगाबाद.

## प्रकरण क्र. सीजीआरएफ/एझेड/शहर/६२०/२०१७/१३

**(नोदंणी क्रमांक २०१७०३००६९)**

| | | |
|---|---|---|
| तक्रार दाखल | दिनांक :- | १५.०३.२०१७ |
| निकाल | दिनांक :- | १९.०४.२०१७ |

श्री. चंद्रशेखर बन्सीलाल मालानी — तक्रारदार
घर नं. -३-१३-९२, सेव्हन हिल रोड,
औरंगाबाद ४२१००१
(ग्राहक क्रमांक ४९००१२३४७६२३)

## विरुध्द

१) कार्यकारी अभियंता (प्रशासन), — गैरअर्जदार
नोडल ऑफिसर,
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी म .
शहर मंडल, औरंगाबाद.

२) अतिरिक्त कार्यकारी अभियंता,
मराविविकंम, भरारी पथक,
शहर मंडल, औरंगाबाद

## मंच

| | |
|---|---|
| १ ) डॉ.भास्कर पालवे | अध्यक्ष |
| २ ) श्री. उत्तम.म.उरकुडे | सदस्य / सचिव |
| ३ ) श्री. वि. सु. काबरा | सदस्य |

# ग्राहक गा-हाणे निवारण मंच -निर्णय

अर्जदार श्री. चंद्रशेखर बन्सीलाल मालानी, घर नं. -३-१३-९२, सेव्हन हिल रोड, औरंगाबाद हे महावितरणचे ग्राहक असून त्यांचा ग्राहक क्रमांक ४९००१२३४७६२३ असा आहे. त्यांनी गैरअर्जदार कार्यकारी अभियंता तथा नोडल ऑफिसर, महावितरण, शहर मंडल, औरंगाबाद यांचे विरुध्द महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक गा-हाणे निवारण मंच व विद्युत लोकपाल) विनियम २००६ यातील परिशिष्ट -अ नमुन्यात दिनांक १५.०३.२०१७ रोजी तक्रार दाखल केलेली आहे. अर्जदाराने दाखल केलेल्या तक्रारीचा थोडक्यात तपशिल खालील प्रमाणे आहे.

अर्जदाराने ऑक्टोबर २००७ मध्ये होर्डिंगला विद्युत पूरवठा करण्यासाठी वीज जोडणीची मागणी केलेली आहे असे असून देखील महावितरण कंपनीने अर्जदारास दुसऱ्या कॅटेगरीमध्ये वीज बिलाची आकारणी केली. सदरहू टॅरिफ मध्ये LT-X B Public Service अशी वर्गवारी करुन अर्जदारास बिल देण्यात आले. वर्गवारी करण्यात अर्जदाराचा कोणताही संबंध नाही. होर्डिंगसाठी बसविलेले विद्युत मिटर हे कोणत्या वर्गवारीत मोडते हे ठरवण्याचा अधिकार संपुर्णतः गैरअर्जदार यांचा आहे. MERC च्या विनियमानुसार अर्जदाराच्या विद्युत पूरवठयाची वर्गवारी अर्जदाराने केलेली नाही. भरारी पथकाने अचानकपणे अर्जदाराच्या मीटरची तपासणी केली आणि अर्जदारास दिनांक १५.१०.२०१५ ला विद्युत कायदा २००३ चे कलम १२६ अंतर्गत रुपये ६,४६,४६१/- या रकमेच्या वीजबीलाची आकारणी केली नंतर गैरअर्जदाराने अर्जदाराच्या होर्डींगला लावलेला विद्युत पूरवठा खंडीत केला.

अर्जदाराच्या म्हणण्यानुसार त्यांनी विद्युत मिटरमध्ये Tampering केलेले नाही. विजेची चोरी केलेली नाही. वीज वापराच्या प्रकारात बदल केलेला नाही किंवा वीज वापराचे ठिकाण बदलले नाही.

यावरुन असे स्पष्ट होते की, ही बाब वीज वापराच्या दराची वर्गवारी बदलण्याचा असून तो विद्युत कायदा २००३ मधील कलम (१२६) अंतर्गत येत नाही.

अर्जदाराने अशी विनंती केलेली आहे की, माझा विद्युत पुरवठा त्वरीत सुरु करण्यात यावा. मला दिलेले चुकीचे वीज बील रद्द करावे व नविन वर्गवारीनुसार जाहीरातीसाठी व होर्डींगसाठी असलेल्या LT-VIII नूसार वीज बिलाची आकारणी डिसेंबर २०१५ पासून करावी.

**<u>कार्यकारी अभियंता (प्रशासन), नोडल ऑफिसर, महावितरण, शहर मंडल, औरंगाबाद यांचे म्हणणे.</u>**

गैरअर्जदार नं. २, अतिरिक्त कार्यकारी अभियंता, भरारी पथक, शहर मंडल, औरंगाबाद महावितरण यांनी दिनांक २९.०३.२०१७ रोजी लेखी स्वरुपात आपले म्हणणे मांडले आहे. त्यांच्या म्हणण्यानुसार अर्जदाराच्या जाहिरात व होर्डींग या ठिकाणी भरारी पथकाने दिनांक १३.१०.२०१५ रोजी अचानक भेट दिली व विद्युत पूरवठयाचे निरीक्षण व पाहणी केली. पाहणी करतांना गैरअर्जदार नं.२ यांना अर्जदारास LT-X B (Public Service Tariff Category) या वर्गवारीत विद्युत पूरवठा केल्याचे आढळुन आले.

वस्तुतः जाहिरात व होर्डींग व्यवसाय हा LT-VIII या वर्गवारीत मोडतो. ही सर्व पाहणी अर्जदाराचे समक्ष करण्यात आली व अर्जदाराच्या प्रतिनिधींनी तपासणी अहवालावर स्वाक्षरी केली. गैरअर्जदार नं. २ यांच्या असे लक्षात आले की, अर्जदारास ज्या कारणासाठी विद्युत पुरवठा देण्यात आलेला आहे. त्या ऐवजी वेगळया वर्गवारीसाठी विजेचा वापर केलेला आहे. त्यामुळे अर्जदारास विद्युत कायदा २००३ च्या कलम १२६ नुसार रुपये ६,४६,४६१/- चे (Provisional Assessment Bill) दिनांक १५.१०.२०१५ रोजी देण्यात आले. त्यानंतर अर्जदाराने गैरअर्जदार नं. २ यांचेकडे संपर्क साधला नाही. त्यामुळे गैरअर्जदाराने ६,४६,४६१/- रुपयांची अंतिम Assessment दिनांक १०.११.२०१५ रोजी केली.

त्यानंतर अर्जदाराने दिनांक २२.१२.२०१५ रोजी गैर अर्जदार नं. २ यांचे कार्यालयात संपर्क साधला व अर्जदाराने २००७ मध्ये विद्युत पुरवठा घेण्यासाठी गैरअर्जदार क्रमांक १ यांचेकडे अर्ज केला. त्यावेळी विद्युत पूरवठा, जाहिरात व होर्डींग या कारणासाठी २००७ मध्ये केलेल्या अर्जात मागणी केली होती असे निदर्शनास आले. जाहिरात व होर्डींग ही Activity कोणत्या (Tariff Category) मध्ये येते हे ठरवणे गैरअर्जदार क्रमांक -१ यांच्या अखत्यारीत येते.

त्या नंतर गैरअर्जदार नं.२ यांनी सादर केलेल्या २२.१२.२०१५ च्या स्पष्टीकरणानुसार अंतिम Assessment Bill मागे घेतले व अर्जदारास रुपये ३,२५,१०४/- या किंमतीचे निव्वळ वर्गवारी फरकाचे बिल दिनांक २३.१२.२०१५ रोजी ९६ महिन्यांसाठी देण्यात आले. अद्याप अर्जदाराने सदरचे बिल भरलेले नाही. वस्तुतः हे बील अर्जदाराने भरणे आवश्यक आहे. त्यामुळे अर्जदाराची तक्रार खारीज करण्यात यावी व सदरचे बिल भरण्याचा आदेश द्यावा.

**ग्राहक गा-हाणे निवारण मंचाचे निष्कर्ष**

१) अर्जदारास दिनांक ०५.१०.२००७ ला जाहिरात व होर्डिंग या प्रकारासाठी गैरअर्जदार नं.१ यांचेकडुन विद्युत पूरवठा देण्यात आलेला आहे. अर्जदाराने विद्युत पूरवठा मागणी केलेल्या अर्जात विजेचा वापर जाहिरात व होर्डिंग या कारणासाठी मागणी केलेली आहे असा स्पष्ट उल्लेख आहे.

२) सदर अर्जदाराच्या जाहिरात व होर्डिंग या कॅटेगरीचे कनेक्शन (NSC) फीड करतांना (LT-VIII) ही कॅटेगरी करण्याऐवजी (LT-XP) करण्यात आली.

३) NSC फिडींग करणे व त्याची योग्य ती वर्गवारी करणे ही सर्वस्वी जबाबदारी गैरअर्जदार नं.१ ची आहे.

४) Category चुकीची फीड केल्याची बाब ही गैरअर्जदार नं.२ यांनी १३.१०.२०१५ रोजी अर्जदाराच्या होर्डिंग मीटरची अचानक पाहणी केली त्या वेळेस लक्षात आणुन दिली.

५) मा. महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग यांच्या दिनांक ११.०२.२००३ च्या आदेशानुसार (Case No. 24) / 2003) वीज बिलातील फरकाची मागणी ही ज्या दिवशी चुक लक्षात आली त्या तारखेपासून करावा, असे नमुद केले आहे.

६) Hon. Appellate Tribunal of Electricity यांच्या दिनांक०७.०८.२०१४ (Appeal No. 131/2013) नुसार (Tariff Difference) च्या फरकाच्या रकमेची वसुली ही ज्या दिवशी चुक लक्षात आली त्या दिवसापासून करावा, असे नमुद केले आहे.

७) अर्जदाराच्या Tariff Category ची चुक दिनांक १३.१०.२०१५ रोजी गैरअर्जदार नं.२ यांच्या लक्षात आली. त्यामुळे Tariff Difference ची वसुली दिनांक १३.१०.२०१५ पासून करणे आवश्यक आहे.

८) चुकीची वर्गवारी करुन महावितरण कंपनीचे आर्थिक नुकसान करणाऱ्या अधिकारी / कर्मचारी यांचेवर शिस्तभंगाची कारवाई करणे क्रमप्राप्त आहे.

वरील प्रमाणे अर्जदार, गैरअर्जदार नं. १ व २ यांनी सादर केलेले म्हणने आणि ग्राहक गाऱ्हाणे मंचाने काढलेले निष्कर्ष याचा विचार करता मंच खालील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

# आदेश

१) अर्जदाराकडुन वर्गवारी बदलाच्या फरकाच्या रकमेची वसुली ही दिनांक १३.१०.२०१५ पासून करण्यात यावी व सुधारीत बील देण्यात यावे, यापुर्वी दिलेले बील रद्द करण्यात यावे.

२) चुकीची वर्गवारी करुन महावितरण कंपनीचे आर्थिक नुकसान करणाऱ्या अधिकारी / कर्मचारी यांचेवर शिस्तभंगाची कारवाई करण्यात यावी.

३) केलेल्या कार्यवाहीचा अनुपालन अहवाल ३० दिवसात सादर करावा.

| | | |
|---|---|---|
| स्वाक्षरीत | स्वाक्षरीत | स्वाक्षरीत |
| डॉ.भास्कर गो.पालवे | उत्तम.म.उरकुडे | विलासचंद्र.सु.काबरा |
| अध्यक्ष | सदस्य/सचिव | सदस्य/सचिव |